ARTHA, Poona 4

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें प्रमुख मराठी वृत्तपत्र

स्थापना : १९३५

# अर्थ

"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।

—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या बुधवारीं प्रसिद्ध होतें.

वार्षिक वर्गणी : ६ रु.

टेलि. ५५६२७


दुर्गाधिवास, पुणें ४

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT

Reg. No. B. 3434. Licence No. 53

वर्ष ३१ | पुणें, बुधवार ४ ऑगस्ट, १९६५ | अंक १५






"हें सारं आम्हाला कळतं, पण उपाय काय ?"

**उपाय आहे !**

घरांत मोठा पोरवडा असेल तर तें घर खऱ्या कौटुंबिक सुखाला व आनंदाला पारखे होते—
मुलांना धड खायला-प्यायला मिळत नाहीं कीं त्यांचे व्यवस्थित शिक्षण होत नाहीं —
आणि घरांतील स्त्री ? सारखी बाळंतपणं होत गेल्यानं आणि जन्मभर मुलांच्या खस्ता काढाव्या लागल्यानं तिच्या शरीराची तर नुसती चाळणी होते.



हे सर्वांना कळतं पण खात्रीचा उपाय नाही म्हणूनच केवळ माणूस स्वस्थ बसतो—
**उपाय नाहीं असें आता म्हणूं नका, उपाय आहे आणि तो म्हणजे लूप !**



लूप हे कुटुंबनियोजनाचे एक नवे अतिशय सोयिस्कर, सुलभ व सुरक्षित साधन आहे. प्लॅस्टिकचे बनविलेले हे कडे स्त्रियांच्या गर्भाशयांत बसवितात आणि तेथें ते अनेक वर्षे राहू शकते. लक्षांत ठेवा, त्याची परिणामकारकता ९९ टक्क्यांहून अधिक आहे.



स्त्री-डॉक्टर हे लूप कांहीं थोड्या मिनिटांच्या आंत बसवितात. यांत कांही सुद्धां त्रास किंवा वेदना होत नाहींत. शस्त्रक्रियेची गरज नसते



मूल हवे अशी नंतर इच्छा झाल्यास बसविलेले लूप स्त्री-डॉक्टरकडून अगदी सहज काढून घेतां येते.

## सरकारी कुटुंब नियोजन केंद्रांत लूप मोफत बसवून देतात

# कुटुंब छोटे सुख मोठे

सविस्तर माहितीसाठी नजीकच्या कुटुंब नियोजन केंद्रास भेट द्या

प्रसिद्धी संचालक, महाराष्ट्र शासन, मुंबई

**नेपाळमधील रस्त्यासाठी मदत**—नेपाळमध्यें पूर्व-पश्चिम जाणारा २२० मैल लांबीचा राजरस्ता मदत म्हणून बांधून देण्याचें भारत सरकारनें मान्य केलें आहे. रस्त्याच्या कामाची प्राथमिक पाहणी ऑक्टोबरमध्यें सुरू करण्यांत येणार आहे. बांधणीचें काम भारताच्या चौथ्या पंचवार्षिक योजनेंत करण्यांत येणार असून त्यासाठी १२ कोटी रुपये खर्च येणार आहे. हा रस्ता एकूण ६५० मैल लांबीचा होणार असून त्यापैकी ४१० मैल रस्त्याच्या बांधणीचें काम भारत करणार आहे. रस्ता बांधणीच्या कामासाठी लागणारी यंत्रसामग्री अमेरिकेचें मदत मंटळ पुरविणार आहे. नेपाळमधील राजरस्ते बांधण्यांत रशिआ व अमेरिकाहि भाग घेत आहेत.

**उंदरांकडून होणारा धान्याचा नाश**—भारताचे अन्नमंत्री श्री. सुब्रह्मण्यम् ह्यांनीं अशी माहिती सांगितली कीं देशांतील अन्नधान्याच्या उत्पादनापैकी १० टक्के धान्याचा उंदीर अगर इतर प्राण्यांकडून नाश होतो. भारतामधील उंदरांची संख्या सुमारें २४० कोटी असावी असा अंदाज करण्यांत आला आहे; उंदरांकडून दरसाल नाश होणाऱ्या अन्नधान्याची किंमत १,८०० कोटी रुपयांच्या घरांत जाते. २० उंदीर एका माणसाला लागणाऱ्या अन्नधान्याचा फडशा पाडतात. दोन वर्षांपूर्वी मद्रास राज्यांतील तंजावर जिल्ह्यांत उंदरांना नष्ट करण्याची एक मोहीम हातीं घेण्यांत आली होती. ह्या मोहिमेंत ७ लाख उंदरांचा नाश करण्यांत आला.

**एअर इंडिआ इंटरनॅशनलची इमारत**—मुंबईमधील समुद्रकाठीं नरीमन पॉइंटवर एअर इंडिआ इंटरनॅशनल विमान कॉर्पोरेशन स्वतःच्या उपयोगासाठी एक भव्य इमारत बांधीत आहे. ह्या इमारतीला २४ मजले बांधण्यांत येणार असून मुंबईतील उंच इमारतींपैकी ती एक मोठी इमारत होईल. इमारतीची उंची ३३३ फूट असेल आणि तींत वापरण्यासारखी ५ लाख ५० हजार चौरस फूट जागा असेल. सुखद हवा राखण्याची व्यवस्था तींत असेलच. इमारतीच्या वरच्या मजल्यावरून हिंदी महासागराचा देखावा चांगला दिसेल. इमारतीच्या गच्चीवर बगीचा लावण्यांत येणार आहे.

**इंदूरमध्यें तीन मोठीं गुदामें**—मध्यवर्ती गुदाम संघटना इंदूरमधील लक्ष्मी धान्य बाजारांत तीन मोठीं गुदामें बांधणार आहे. प्रत्येक गुदामामध्यें ५ हजार टन धान्य साठवून ठेवतां येईल. गुदामाच्या बांधकामासाठी ७ लाख रुपये खर्च येणार आहे. गुदामांत अन्नधान्याखेरीज शेतीचा इतर मालहि ठेवतां येईल. बांधणीचें काम लवकरच सुरू करण्यांत येत असून तें वर्षाअखेर पुरें होईल.

**निष्काळजीपणाबद्दल शस्त्रवैद्यांना शिक्षा**—फिलिपाइन्समधील चार शस्त्रवैद्यांना शस्त्रक्रिया करतांना निष्काळजीपणा दाखविल्याबद्दल तीन आठवड्याच्या कारावासाच्या शिक्षा देण्यांत आल्या. ह्या शस्त्रवैद्यांनीं १९६३ मध्यें एका स्त्रीच्या पोटांतील मूल बाहेर काढलें. दोन महिन्यांनीं त्या स्त्रीच्या पोटांत दुखूं लागल्यावर तपासणी करण्यांत आली असतां शस्त्रक्रियेच्या वेळीं पोटांत एक टॉवेल राहून गेल्याचें आढळून आलें.


# वैश्य को-ऑपरेटिव्ह बँक लि.

स्थापना : १९४५ ] मुगभाट, मुंबई-४. [ टेलिफोन ७२९००

**बचतीच्या आकर्षक योजना**

| | |
|---|---|
| ( १ ) स्पेशल सेव्हिंग | व्याजाचा दर ३॥ टक्के |
| ( २ ) त्रैवार्षिक मासिक बचत | " ३। " |
| ( ३ ) पंचवार्षिक बचत सर्टिफिकिटें | " ५ " |

*मुदतीच्या आकर्षक दरासंबंधीं चौकशी करा.*

मॅनेजर—ना. शं. कानिटकर

# सरदारगृह

**मुंबईंत राहण्याची व भोजनाची उत्तम सोय.**

**मंगलकार्यें व मेजवान्या यांसाठी सोईस्कर ठिकाण.**

— आमचीं वैशिष्ट्यें —


* हीरकोत्सवानिमित्त अद्ययावत् पद्धतीचें भोजनगृह व अनेक प्रकारच्या सुखसोयी.

* टिळक जन्म-शताब्दिदिनीं लोकमान्यांचें सरदारगृहांत केलेलें स्मारक.

फोन नं. :-३८३३७ ] सरदारगृह प्रा. लि. [ तार-सरदारगृह

फॉर्कर्ड मार्केटजवळ, मुंबई २.

महाराष्ट्र सरकारनें
तगाईवर मंजूर केलेले
"विजय" नांगर
वापरा. ४, ६ व ८ बैली
फाळ व सुटे भाग



तसेंच विजय सेंट्रिफ्युगल पंप्स्




१" ते ४" बेल्ट ड्राइव्ह व डायरेक्टर कपल्ड, शिवाय

बोअरिंगचे हँड पंप्स्, हँड रहाट इ. इ.

**— न्यू विजय इंडस्ट्रीज लि. —**

विश्रामबाग – सांगली ( महाराष्ट्र )

# अर्थ

बुधवार, ४ ऑगस्ट, १९६५





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## अजूनहि कित्येक शेड्यूल्ड बँकांना लायसेन्स कां नाहीं ?

### रिझर्व्ह बँकेच्या धोरणाचा खुलासा हवा

" १९६४ अखेर, भारतांत लायसेन्स दिलेल्या ७३ बँका होत्या आणि ७५ बँकांचे लायसेन्ससाठी अर्ज अद्याप विचारांत होते. बँकिंग कंपन्यांचा कायदा अमलांत आल्यापासून एकूण २०९ बँकांना लायसेन्स नाकारण्यांत आला. आठ बँका ( स्टेट बँक व तिच्या उप-बँका ) खास कायद्यानें अस्तित्वांत आल्या होत्या. १९६४ अखेर एकूण १५६ बँका चालूं होत्या. " ह्या आकडेवारीपासून काय बोध निघतो ?

प्रत्येक बँकेला लायसेन्ससाठी पात्र होण्याकरतां सवड द्यावी, अशी मूळ कल्पना होती. पण १५ वर्षें लोटलीं तरी अद्याप ७५ म्हणजे भारतांतील जवळजवळ निम्म्या बँका लायसेन्सच्या बारीमध्यें उभ्या आहेत ! त्यांना अद्याप लायसेन्स कां देण्यांत आलेला नाहीं ? त्यांचा कारभार लवकरच सुधारण्याची शक्यता आहे काय ? १५ वर्षे सतत राहिलेल्या दोषांवर उपाययोजना कोणती करण्यांत आली ? ह्या बँकांचीं नांवें तरी कोणतीं ?

रिझर्व्ह बँकेनें ह्या सर्व प्रश्नांच्या बाबतींत मौन पत्करलें आहे. प्रचलित बँकांपैकी कोणाला लायसेन्स आहे आणि कोणाला नाहीं, लायसेन्स अजून न देण्याचें कारण काय, ह्याची कुणालाच माहिती नाहीं. लायसेन्स दिलेल्या बँकांची यादी अत्यंत गुप्त राखण्यांत आलेली आहे; रिझर्व्ह बँकेच्या कांहीं वरिष्ठ अधिकाऱ्यांखेरीज बाकी कोणाला त्याची कल्पना नाहीं.

ह्या गुप्ततेचे परिणाम बाजूला ठेवले, तरी इतरहि कांहीं प्रश्न महत्त्वाचे आहेत. भारतांत ७६ शेड्यूल्ड आणि ८० बिगर-शेड्यूल्ड बँका आहेत. रिझर्व्ह बँक कायद्याच्या ४२ व्या कलमानें, दुसऱ्या शेड्यूलमध्यें येण्यासाठीं बँकेनें पुऱ्या करावयाच्या अटी सांगितल्या आहेत :—

( १ ) तिच्या खऱ्या वसूल भांडवलाची व रिझर्व्हजूची मिळून किंमत ५ लक्ष रुपयांपेक्षा जास्त हवी;

( २ ) ठेवीदारांच्या हिताला बाधक होणार नाहीं, अशा रीतीनें आपला कारभार असल्याची तिनें रिझर्व्ह बँकेची खात्री पटवून दिली पाहिजे.

बँकिंग कंपन्यांच्या कायद्याच्या २२ व्या कलमांत लायसेन्स-बद्दल तरतुदी आहेत:—

( १ ) आजच्या व आगामी ठेवीदारांच्या मागणीप्रमाणें रक्कम परत करण्यास बँक समर्थ असली पाहिजे.

( २ ) विद्यमान आणि आगामी ठेवीदारांच्या हितास विघातक होईल, असा तिचा कारभार असतां कामा नये.

दुसरी अट, लायसेन्स देण्याच्या बाबतींत आणि बँक शेड्यूल्ड करण्याच्या बाबतींत जवळजवळ सारखीच आहे. पहिली अट तपासून पाहिली, तर बँकेला लायसेन्स देण्यापेक्षा बँक शेड्यूल्ड-मध्यें होण्यासाठी जास्त कडक कसोटी आहे, असें दिसून येतें. देण्याइतकी येण्याची किंमत असली, म्हणजे लायसेन्सची अट पुरी होऊं शकते. पण, बँक शेड्यूल्ड बँक व्हावयाची म्हटलें, तर येण्यापेक्षा जिंदगी जास्त हवी. कुठल्याहि बँकेला शेड्यूल-मधून काढून टाकण्याचा किंवा लायसेन्स रद्द करण्याचा रिझर्व्ह बँकेला अधिकार आहेच. तेव्हां, जी बँक शेड्यूल्ड होण्यास पात्र आहे, ती लायसेन्सला पात्र असायलाच हवी. लायसेन्स दिलेल्या ७३ बँका ह्या सर्व शेड्यूल्ड बँका नाहींत; त्यांत कांहीं बिगर-शेड्यूल्ड बँकाहि आहेत, आणि शेड्यूल्ड बँकांची संख्या तर ७६ आहे. ह्याचा अर्थ, कांहीं शेड्यूल्ड बँका अजून लायसेन्सला पात्र ठरलेल्या नाहींत. कांहीं बँका लायसेन्सला पात्र असल्या तरी शेड्यूल्ड होण्यास अपात्र असूं शकतील हें पटतें, पण देण्यापेक्षा जिंदगी किमान ५ लक्ष रु. नीं जास्त असतांना, त्यांना लायसेन्स का नाकारण्यांत येतो ? पूर्वी शेड्यूल्ड होण्यास पात्र ठरलेल्या बँकेला आतां शेड्यूलच्या बाहेर काढण्यास रिझर्व्ह बँक तयार नाहीं, असा निष्कर्ष काढावयाचा काय ?

---

## सहकारी साखर कारखान्यांचें उत्पादन वाढलें

१९६४-६५ च्या साखरेच्या हंगामांत सहकारी कारखान्यांना आपल्या उत्पादनांत वाढ करण्यांत यश आलें आहे. ह्या हंगामांत त्यांच्या उत्पादनांत ३०·७० टक्के वाढ झालेली आढळून आली. जुलै महिन्याच्या २२ तारखेपर्यंत देशांतील साखर कारखान्यांनीं एकूण ३१·४४ लाख टन साखर निर्माण केली. दक्षिण भारतामधील कांहीं साखर कारखान्यांचा गळिताचा हंगाम अद्याप संपलेला नाहीं. त्यामुळें साखरेचें उत्पादन ३२ लाख टनापर्यंत होण्याची शक्यता आहे. भारतानें ३ लाख टन साखरेची निर्यात करण्याचें ठरविलें आहे. हंगामांतील वाढलेलें उत्पादन लक्षांत घेतां हें लक्ष्य गांठण्यास जड जाणार नाहीं असें दिसतें. सहकारी साखर कारखान्यांची प्रगति लक्षांत भरण्यासारखी होत आहे. गेल्या हंगामांत सहकारी विभागांतील कारखान्यांनीं ५·७० लाख टन साखर तयार केली होती. ह्या उत्पादनांत चालू हंगामांत २ लाख टनांची भर पडलेली आहे. त्या मानानें खाजगी मालकीचे कारखाने मागे पडलेले दिसतात. साखरेच्या उत्पादनांत चालू हंगामांत एकूण २२·१७ टक्के वाढ झालेली आहे. पण त्यापैकी फक्त १९·७३ टक्के उत्पादनच खाजगी साखर कारखान्यांनीं वाढविलेलें आहे. एकूण ५७ सहकारी कारखान्यांना परवाने देण्यांत आले होते. त्यापैकी ५० कारखान्यांनीं चालू वर्षाच्या हंगामाच्या प्रारंभीं गळितास सुरवात केली. त्यांपैकी २ कारखाने नवीन होते. आणखी ७ सहकारी कारखान्यांची उभारणी चालू असून ते निरनिराळ्या अवस्थेत आहेत. ५० सहकारी कारखान्यांनीं मिळून ७२·४६ लाख मेट्रिक टन ऊंस गाळला. त्यांचा साखरेचा उतारा १०·६१ टक्के पडला. गेल्या वर्षीं हंगाम संपला त्या वेळीं फक्त १·७६ लाख टन साखर शिल्लक राहिली होती. त्यामुळें वर्षाच्या अखेरीस साखरेची बरीच चणचण जाणवूं लागली. ह्या वर्षीच्या हंगामांतील उत्पादन लक्षांत घेतां शिलकी साखर अधिक राहील व साखरेची टंचाई कमी होईल अशीं लक्षणें दिसतात.

## यूनिट ट्रस्टच्या कारभाराचें पहिलें वर्ष

### प्रत्येक यूनिटला ६१ पैसे नफा मिळणार

यूनिट ट्रस्ट ऑफ इंडिआच्या कारभाराचें पहिलें वर्ष ३० जून १९६५ ला संपलें. सरकारी रोख्यांच्या विक्रींत आलेला १·४८ लक्ष रुपयांचा तोटा वजा करतां, ट्रस्टचें एकूण उत्पन्न १·५३ कोटी रु. झालें. कायद्याच्या वेगवेगळ्या तरतुदींप्रमाणें योजना केल्यावर, यूनिटधारकांना वाटण्यासाठी १·१५ कोटी रु. उरतात. प्रत्येक १० रु. च्या यूनिटला ६१·४ पैसे म्हणजे द. सा. द. शे. ६·१४ असें वाटणीचें प्रमाण पडतें. बोर्ड ऑफ ट्रस्टीजनीं ६१ पैसे वाटण्याचें ठरवून उरलेली रक्कम पुढील हिशेबांत ओढण्याचें ठरविलें आहे. इन्कम-टॅक्स कापून न घेतां हें वाटप केलें जाईल. ट्रस्टपासून मिळणारें पहिल्या १००० रु. चें उत्पन्न करमाफ आहे, हें लक्षांत घेतां डिव्हिडंडचा दर ७·८२% पडतो. यूनिट ट्रस्ट-जवळील संपूर्ण रक्कम सरासरी १० महिनेच गुंतली गेली, हें लक्षांत घेतां मिळालेला नफा समाधानकारकच वाटेल. १७ फेब्रुवारी, १९६५ रोजीं बँकरेट वाढल्यानंतर नवी गुंतवणूक अधिक किफायतशीर होणार आहे. त्याचा सुपरिणाम पुढील नफावांटणी-वर होईल.

१ जुलै, १९६४ ते १४ ऑगस्ट, १९६४, यूनिट दर्शनी किमतीला (रु. १०) विकण्यांत आलें. १,२६,६५३ अर्जदारांनीं दर्शनी किमतीला १७·३८ कोटी रु. चे यूनिट घेतले. नंतर यूनिट विक्रीची किंमत दररोजची ठरविण्यांत आली, त्या दरानें विक्री होत गेली. वेगवेगळ्या विक्रीच्या दरानें खालीलप्रमाणें यूनिट विकले गेले :—

| विक्रीची किंमत (प्रत्येक यूनिटला) | मिळालेली रक्कम (लक्ष रु.) |
|---|---|
| रु. १०·०० | १७३७·८९ |
| रु. १०·३५ | ३१·८१ |
| रु. १०·४० | ६२·७८ |
| रु. १०·४५ | १३·४१ |
| रु. १०·५० | ३१·६८ |
| रु. १०·५५ | २२·७४ |
| रु. १०·६० | ११·१७ |
| रु. १०·६५ | २·०० |
| एकूण | १९१३·४८ |

एकूण १९·१३ कोटी रुपयांच्या यूनिटपैकी १७·७३ कोटी रुपयांचे यूनिट व्यक्तींनीं घेतले आणि १·४० कोटी रुपयांचे यूनिट संस्थांनीं घेतले. प्रत्येक व्यक्तीच्या होल्डिंगची सरासरी १,३०० रु. पडली.

१६ नोव्हेंबर, १९६४ पासून ट्रस्टनें यूनिटची फेरखरेदी सुरू केली. एकूण ३,१३० अर्जदारांना वर्षअखेर ४०·५० लक्ष रु. देण्यांत आले. त्याचा तपशील असा :—

| फेर खरेदीची किंमत (प्रत्येक यूनिटला) | दिलेली रक्कम (लक्ष रु.) |
|---|---|
| रु. १०·०० | ९·०० |
| रु. १०·०५ | २७·०० |
| रु. १०·१० | ४·०० |
| रु. १०·१५ | ०·५० |
| एकूण | रु. ४०·५० |

एकूण उभारलेल्या रकमेपैकी सुमारें २·१% रक्कम अशा रीतीनें परत दिली गेली. ग्रेट ब्रिटन व अमेरिका येथील तत्सम प्रमाण ५ ते ७% पडतें. ह्यावरून, येथील लोक यूनिटमधील गुंतवणूक दीर्घ मुदतीचीच समजतात, असें दिसून येईल. आतां (३० जून १९६५नंतर) यूनिट शेअर्सप्रमाणें वर्ग करतां येऊं लागले आहेत. कर्जे घेण्यासाठी ते बँकेच्या नांवानेंहि करतां येतात. प्रमुख बँकांनीं यूनिटच्या तारणावर कर्जे देण्यास मान्यता दिली आहे.

भांडवलाची सुरक्षितता राखून जास्तींत जास्त उत्पन्न मिळविणें, हें ट्रस्टच्या गुंतवणुकीचें धोरण आहे. खालील तक्त्यांत गुंतवणुकीचा तपशील दिला आहे :—

| | कोटी रु. | % |
|---|---|---|
| ऑर्डिनरी भाग | ९·५ | ३८·७ |
| प्रेफरन्स भाग | १·९ | ७·७ |
| डिबेंचर्स | ९·३ | ३७·९ |
| पब्लिक कॉर्पोरेशन्सचे बाँड | ०·७ | २·९ |
| डिबेंचर खरेदीसाठी आगाऊ डिपॉझिट | ०·७ | २·८ |
| कॉल आणि मुदतीच्या ठेवी | २·५ | १०·० |
| एकूण | २४·६ | १००·० |

गुंतविलेल्या एकूण रकमेपैकी ९९·२% रक्कम वक्तशीर डिव्हिडंड किंवा व्याज देणाऱ्या कंपन्यांत गुंतविलेली आहे. फक्त ०·८% रक्कम १९ उदयोन्मुख कंपन्यांत गुंतविलेली आहे; त्यांचें उत्पादन लवकरच सुरू होऊन भागांची किंमत दर्शनी किमतीपेक्षा जास्त होईल, अशी अपेक्षा आहे. ट्रस्टच्या गुंतवणुकीची बाजारभावानें होणारी किंमत १·६% नें उतरली आहे. ह्या घसाऱ्याचा यूनिटच्या विक्रीच्या आणि फेरखरेदीच्या किमतीवर होणारा परिणाम कमी करण्याचा मार्ग ट्रस्टींचें बोर्ड शोधीत आहे.

---

## प्लॅस्टिकच्या मालाच्या निर्यातीला भरपूर वाव

येत्या कांहीं वर्षांत भारताला प्लॅस्टिकचा माल बनविण्याच्या बाबतींत आणि तो निर्यात करण्याच्या बाबतींत महत्त्वाचें स्थान मिळवितां येईल असा विचार प्लॅस्टिकच्या मालाची निर्यात वाढविण्याचे प्रयत्न करणाऱ्या मंडळाचे अध्यक्ष श्री. आर. एम्. पटेल ह्यांनीं व्यक्त केला आहे. ते म्हणाले कीं, गेल्या दोन वर्षांत भारतांतून निर्यात करण्यांत येणाऱ्या प्लॅस्टिकच्या मालांत तिपटीनें वाढ झालेली आहे. १९६२–६३ सालांत १ कोटी, ४ लाख रुपयांचा माल निर्यात करण्यांत आला. १९६४–६५ सालांत ३ कोटी, १८ लाख रुपयांचा माल निर्यात करण्यांत आला. तथापि ह्या मालाची निर्यात झपाट्यानें वाढविण्यासाठी आयात करणाऱ्या देशांच्या बाजारपेठांबाबत संशोधन करण्यांत आलें पाहिजे. त्याचप्रमाणें गिऱ्हाइकांच्या आवडीनिवडीचा अभ्यास आणि मालाच्या तऱ्हा ह्याकडेहि लक्ष देण्याची आवश्यकता आहे. भारताच्या औद्योगीकरणांत ह्या मालाला चांगली मागणी आहे आणि पेट्रोल–रासायनिक धंद्याच्या वाढीमुळें प्लॅस्टिकसाठी लागणाऱ्या कच्च्या मालाची सुलभताहि भारतांत लवकरच होण्यासारखी आहे.

## कुटुंबनियोजनाच्या कार्यक्रमाला आतां गति येणार

### स्वस्त, निरुपद्रवी, परिणामकारक, एकदाच करावयाचा उपचार उपलब्ध झाला

लेखक: श्री. ह. गो. वर्तक, उपमंत्री, आरोग्यखातें, महाराष्ट्र शासन.

संततिप्रतिबंधक साधनें आतां सर्रास वापरलीं जाऊं लागलीं आहेत. कन्डोमचा अधिकाधिक वापर केला जात आहे. हीं साधनें निरुपद्रवी, बरीचशीं परिणामकारक आणि स्वीकारार्ह असलीं तरी या साधनांचा सतत उपयोग करण्याचा माणसाला कंटाळा येणें हें मनुष्यस्वभावास धरून आहे. शिवाय, अशीं साधनें मिळविण्यासाठी कुठल्यातरी संस्थेकडे जावें लागतें आणि ही गोष्ट आपल्या ग्रामीण जनतेला व कमी मिळकतवाल्या लोकांना रुचणारी नसते. एखादाच लहानसा व थोडक्यांत होणारा उपचार असेल तर तो लोकांना हवा असतो. म्हणूनच पुरुषांवरील शस्त्रक्रियेचा उपाय लोकप्रिय झाला. तथापि ज्यांना अपेक्षित मुलें आधींच आहेत त्यांनाच फक्त शस्त्रक्रियेच्या उपायाचा अवलंब करतां येतो; मुलांमधील अंतर कमी करण्याच्या दृष्टीनें हा उपाय उपयोगी पडत नाहीं.

या विविध उपायांतील उणीवा लक्षांत घेऊन नवे उपाय शोधण्याच्या दृष्टीनें अभ्यास व संशोधन करण्यांत आलें. 'लूप' हें नवीन साधन आतां उपलब्ध झालें असून त्यास इंटरनॅशनल प्लॅन्ड पेरेंटहूड फेडरेशनची आणि इंडियन कौन्सिल ऑफ मेडिकल रिसर्च या संस्थेची मान्यता मिळाली आहे. भारत सरकारनेंहि या साधनास मान्यता दिली आहे. इ. यु. डी. (इंट्रा-युटेरिन डिव्हाइस) किंवा लूप हें साधन आतां राष्ट्रीय कुटुंबनियोजन कार्यक्रमाचा एक भाग झालें आहे.

या संस्थेनें मान्य केलेलें साधन डॉ. लिपी यांनीं तयार केलें व वापरलें म्हणून या साधनाला 'लिपीज लूप' असें संबोधलें जातें. इंग्रजी एस हें अक्षर दोनदा एकाखालीं एक असें काढलें तर जो आकार होईल तसें हें लूप असतें. बहुतेक स्त्रियांना लूपचा वापर करतां येतो. हें साधन तसें नवीन नाहीं. १९३० ते ४० च्या दरम्यान डॉ. ग्रॅफेनबर्ग यांनीं संततिप्रतिबंधक साधन म्हणून चांदीचें कडें वापरलें होतें. परंतु चांदी हा धातु या कार्यासाठी उपयुक्त नसल्याचें आढळून आल्यावरून यासाठी दुसऱ्या एखाद्या पदार्थाचा तपास करण्यांत आला आणि पोलेथिन प्लॅस्टिक हा पदार्थ या कामासाठी योग्य असल्याचें दिसून आलें. अनेक डॉक्टरांनीं या बाबतींत प्रयोग केले; हे प्रयोग निरनिराळ्या देशांत करण्यांत आले. इंडियन कौन्सिल फॉर मेडिकल रिसर्च या संस्थेनेंहि भारतांत ५० प्रयोग केले. नंतर १९६५ च्या जानेवारींत या संस्थेची औरंगाबाद येथें बैठक झाली तेव्हां संस्थेनें हाताळलेल्या ३,५६३ प्रकरणांचा आढावा घेण्यांत येऊन लूपचा उपाय बिनधोक असल्याचा निर्णय दिला. मात्र हें लूप बसविण्याचें कार्य वैद्यकीय जाणकारांनीच केलें पाहिजे असाहि निर्णय करण्यांत आला.

हें साधन गर्भाशयांत जाऊन बसत असल्यामुळें दीर्घ कालानंतर त्यापासून धोका निर्माण होईल कीं काय अशी धास्ती वाटण्याचा संभव असतो. तथापि या बाबतींत केलेल्या प्रयोगांवरून असें दिसून आलें आहे कीं, 'लूप' च्या दीर्घकालीन अस्तित्वामुळें कांहींहि इजा होत नाहीं. 'लूप' एकदा बसविल्यानंतर तें दीर्घकाळ राहूं शकतें आणि जेव्हां गर्भधारणेची इच्छा असेल तेव्हां तें काढतां येतें. तसेंच मासिक पाळी बंद होण्याचें वय झाल्यानंतरहि लूप काढून टाकण्यास हरकत नाहीं.

लूप गर्भाशयांत असेपर्यंत गर्भधारणा होण्याची जवळ जवळ मुळींच शक्यता नसते. इंडिअन कौन्सिल ऑफ मेडिकल रिसर्चनें केलेल्या प्रयोगांवरून असें आढळून आलें कीं, गर्भधारणा झालेल्या स्त्रियांचें प्रमाण ०·३ ते ३ टक्क्यांपर्यंत असूं शकतें. याचाच अर्थ असा कीं, लूप बसविलेल्या २०० स्त्रियांपैकी एखाद्या स्त्रीच्या बाबतींत लूप अयशस्वी होण्याची शक्यता असते. तेव्हां या साधनाची परिणामकारकता ९९·५ टक्के आहे. एवढी परिणामकारकता फक्त निर्बीजीकरणानें येऊं शकते. 'लूप' हें शस्त्रक्रियेइतकेंच परिणामकारक असलें तरी शस्त्रक्रियेंत पुन्हां मुलें होण्याची जी सोय नाहीं ती ह्या 'लूप' मध्यें आहे. लूप काढून घेतल्यानंतर तीन महिन्यांत गर्भधारणा होण्याची शक्यता असते.

ग्रामीण भागांत व कमी मिळकतीच्या लोकांना संततिप्रतिबंधक साधनें मोफत पुरविलीं जातात व शस्त्रक्रियाहि मोफत केल्या जातात, परंतु साधनांच्या बाबतींत प्रत्येक जोडप्यामागें सरकारला २० रु. आणि प्रत्येक शस्त्रक्रियेच्या बाबतींत ५ रु. (कॉम्पेन्सेन्टरी अलावन्स वगैरे सोडून) खर्च येतो. परंतु लूपच्या बाबतींत प्रत्येकी सरकारला २५ पैसे खर्च येणार आहे. तेव्हां लूप हें अत्यंत स्वस्त असें साधन आहे. लूप भारतांत तयार करण्याची योजना आंखण्यांत आली असून लौकरच त्याचें उत्पादन सुरू होईल.

तेव्हां लूप हें पुढील कारणासाठी आदर्श असें संततिप्रतिबंधक साधन आहे. (१) तें अतिशय परिणामकारक आहे. (२) तें लोकप्रिय होण्याची शक्यता आहे. (३) तें निरुपद्रवी आहे. (४) स्वस्त आहे. (५) भरपूर उपलब्ध होण्याची शक्यता आहे. (६) एकदाच करावयाचा हा उपचार आहे. (७) गर्भधारणेचीहि त्यांत सोय आहे. लूप बसविण्याचें कार्य व्यापक प्रमाणावर करतां येण्यासारखें आहे. ग्रामीण भागांत कुटुंबनियोजनाचीं ४८२ आणि शहर भागांत १४२ केंद्रें आहेत. यांपैकीं कुठल्याहि केंद्रावर लूप बसवून देतां येईल एवढेंच नव्हें; तर प्रसूतिगृहें, इस्पितळें आणि खाजगी वैद्यकव्यवसाय यांनीं मागणी केली तर त्यांनाहि लूपचा पुरवठा करण्यांत येईल. शहर भागांत तर मोठ्या प्रमाणावर हें कार्य करतां येण्यासारखें आहे. प्रश्न आहे, ग्रामीण भागांत मोठ्या प्रमाणावर हा कार्यक्रम अंमलांत कसा आणावयाचा? कारण लूप बसविण्याच्या कामासाठी लेडी डॉक्टरांची गरज आहे. परंतु तेवढ्या लेडी डॉक्टर मिळत नसल्यानें ग्रामीण भागांत हा प्रश्न खरोखरच गंभीर आहे. तथापि खाजगी वैद्यक व्यावसायिकांच्या सहकार्यानें हा कार्यक्रम ग्रामीण भागांतहि पार पाडतां येईल अशी उमेद आहे.

आदर्श अशा संततिप्रतिबंधक साधनाच्या अंगीं असावे लागणारे बहुतेक सर्व गुण 'लूप' मध्यें असल्यामुळें या साधनाद्वारां कुटुंबनियोजनाच्या कार्यक्रमाला चांगली गति येईल आणि मलेरियानिर्मूलन मोहिमेंत जें स्थान डी. डी. टी. ला मिळालें तेंच स्थान कुटुंबनियोजनाच्या मोहिमेंत 'लूप' ला मिळेल अशी अपेक्षा आहे. मोठ्या प्रमाणावर हा कार्यक्रम हातीं घेतल्यावर येत्या तीन वर्षांत प्रशंसनीय परिणाम दिसून येईल असा भरंवसा आहे.

---

**जपानी पद्धतीची बाग**—दिल्ली येथें जपानी पद्धतीची एक मोठी बाग लावण्याच्या कामास प्रारंभ करण्यांत आला आहे. भारतांतील अशा प्रकारची ती पहिलीच बाग होईल. ती तयार करण्यासाठी ८ लाख रुपये खर्च येणार आहे. दिल्ली कॉर्पोरेशननें बागेसाठी ३ लाख रुपये आतांपर्यंत खर्च केले आहेत. बाग पं. नेहरूंच्या सूचनेप्रमाणें तयार करण्यांत येत आहे.

## हॉटेल आणि पर्यटन महामंडळें

[ हॉटेल नि पर्यटन अशीं दोन महामंडळें स्थापन करण्यांत आलीं असून लवकरच तीं आपल्या पायावर उभीं राहतील. ]

परदेशी प्रवाश्यांना व्हिसा मिळणें आतां सुलभ झालें आहे. तीन महिन्यांसाठीच राहावयाचें असेल तर अनेक तक्ते भरण्याची कटकट त्यांच्या पाठीमागें नाहीं. देशभर चालणारें दारु परवानेहि त्यांना मिळतात.

जुन्या हॉटेलांचें नूतनीकरण व आधुनिकीकरण झालें आहे आणि वातानुकूल खोल्यांची सोय आतां केवळ दुर्मिळ चैन राहिलेली नाहीं. खाटांच्या संख्येंत आपल्याला हवी तेवढी वाढ झाली नसली तरी त्यांचीहि संख्या वाढतीच आहे. सन १९५७ मध्यें ९,८०० खाटांची सोय होती तर १९६४ सालांत हॉटेल्समध्यें एकूण १३,१०० खाटा उपलब्ध होत्या. ज्यांचें बांधकाम चालू आहे. अशा हॉटेल्सचें बांधकाम पूर्ण झाल्यावर सुमारें २,००० खाटांची भर यांत पडणार आहे.

आडबाजूला असलेल्या परंतु प्रवाशांना आकर्षित करूं शकतील अशा ठिकाणीं प्रवाश्यांना सोयीं उपलब्ध करून देण्याकरतां १९५४ पासून आतांपर्यंत ७ कोटी रुपये खर्च करण्यांत आले. सध्यां पर्यटन खात्यामार्फत २१ आणि राज्य सरकारांकडून ४० प्रवासी बंगले चालू आहेत. या बंगल्यांतील जागांचे दर मध्यमवर्गीयांना झेपतील असेच ठेवण्यांत आले आहेत.

प्रवाशांना भाड्यानें मोटारी देण्याच्या योजनेनुसार निरनिराळ्या प्रवासीप्रिय मार्गांसाठी ३०० मोठ्या मोटारी नि २५ प्रवासी बस ठेवण्यांत आल्या आहेत. त्यांपैकीं कांहीं बसमधून वातानुकूलतेची सोय आहे. रस्त्यांची सुधारणा करण्यांत आली आहे नि प्रमुख ठिकाणीं मार्गदर्शकहि मिळूं शकतात. काराव्हिल, व्हायकाउंट फॉकर फ्रेंडशिप, इत्यादि नवीन प्रकारचीं विमानें वापरून देशांतर्गत विमानवाहतूक अद्ययावत् करण्यांत आली आहे.

सन १९६४ सालांत भारतांत आलेल्या १,५७,००० प्रवाश्यांपैकी ७० टक्के प्रवासी युरोप, अमेरिका, ऑस्ट्रेलिया आणि जपान या दूर देशांतून आलेले होते. एकदां मोठ्या संख्येनें प्रवासी येऊं लागले कीं, अनेक प्रश्नांना आपल्याला तोंड द्यावें लागेल. अंतर्गत विमानवाहतुकीची पुरेशी सोय, अधिक खाटा, भाड्याच्या मोटारी, वातानुकूल गाड्या, चांगली विक्रीकेंद्रें नि मार्गदर्शक इत्यादि सोयी उपलब्ध करून देण्याकरतां खूप प्रयत्न आपल्याला करावे लागतील.

इतक्या मोठ्या प्रमाणावर या सर्व सोयी खाजगी प्रयत्नांतून निर्माण होऊं शकणार नाहींत. ज्या नवीन प्रवासी स्थळांमध्यें सुरुवातीला थोडा तोटा सहन करून हॉटेल्स वगैरे बांधावीं लागतील तें कामहि खाजगी हॉटेल मालक अंगावर घेणार नाहींत. म्हणूनच हॉटेल महामंडळाची स्थापना करण्यांत आली.

थायलंड, सिलोन, मलेशिया व नेपाळ इत्यादि आपल्यासारख्याच अविकसित देशांनीं एकत्र येऊन, प्रवासी आकर्षित करण्यासाठीं सहकार्यानें प्रसिद्धियंत्रणा उभारावी या कल्पनेबाबत या देशांच्या सरकारांशीं बोलणीं करण्याची संधि अलीकडेच आपल्याला मिळाली. त्यांनीं या कल्पनेचें उत्साहानें स्वागत केलें असून यांतून एक संयुक्त कार्यक्रम आंखला जाईल अशी आशा आहे.

चौथ्या पंचवार्षिक योजनेंत पर्यटनासाठी २५ कोटी रुपयांची तरतूद करण्यांत येईल. त्यापैकी ५ कोटी रु. वरील दोन महामंडळांसाठी राखून ठेवण्यांत येतील तेवढी रकम 'विकास निधि' म्हणून बाजूला ठेवण्यांत येईल नि त्यांतून खाजगी हॉटेल्सकरतां कर्जें इत्यादि देण्यांत येतील. निवडक प्रवासी स्थळांच्या एकत्रित विकासासाठी ६ कोटी रु. खर्च करण्यांत येतील आणि राज्य सरकारांनीं हातीं घ्यावयाच्या योजनांकरतां नि इतर प्रवासी स्थळांवर उरलेल्या ९ कोटी रुपयांचा विनियोग करण्यांत येईल.

---

## खेडोपाडीं टपालाची वाढती सोय

टपाल व तार खात्यानें केलेल्या प्रगतीची कल्पना पुढील आंकड्यांवरून येईल:—

१. दहा वर्षांपूर्वीं टपालसेवेचा लाभ फक्त १,८६,००० खेड्यांनाच मिळत होता. तिसऱ्या योजनेच्या अखेरीस हा आंकडा ५,६७,००० वर जाईल. कांहीं अविकसित ग्रामीण विभागांतील कचेऱ्या तोट्यांत चालवाव्या लागतात. तरीहि लोकहित लक्षांत घेऊन त्या चालविण्यांत येतात.

२. भारत स्वतंत्र झाला तेव्हां देशांत २२,११६ टपाल-कचेऱ्या होत्या. आज त्यांची संख्या १ लाखावर आहे.

३. नित्याच्या टपाल कचेऱ्यांखेरीज अहमदाबाद, मुंबई, कलकत्ता, दिल्ली, मद्रास व नागपूर या शहरांत १० फिरत्या टपाल कचेऱ्या आहेत. २७ शहरांत ४१ रात्र–टपाल कचेऱ्याहि आहेत.

४. स्वातंत्र्यसंपादनाच्या वेळीं टपालकचेऱ्यांत प्रतिवर्षीं १२४ कोटी टपाल वस्तूंची ने–आण होत असे. आतां ही संख्या ५०० कोटींवर गेली आहे. म्हणजेच चौपट वाढली आहे.

५. भारतांतील टपालाची व्यवस्था इतर देशांतील अशाच सेवासोयींपेक्षा अधिक आहे म्हटलें तरी चालेल. उदाहरणार्थ, अमेरिका, कानडा आणि ऑस्ट्रेलिया या देशांत एका टपाल कचेरीच्या कक्षेंत सामान्यतः २६४, ८६२ आणि ९४२ चौ. कि. मीटर क्षेत्र असतें. भारतांत एका टपालकचेरीच्या कक्षेंत ३५·४८ चौ. कि. मीटर क्षेत्र असतें.

चौथ्या योजनेंत चालू सोयी अधिक व्यवस्थित करण्यांत येतील.

ग्रामीण भागांत टपालबटवड्याच्या वेळा वाढविण्याच्या दृष्टीनें प्रयत्न करण्यांत येतील, त्याचप्रमाणें कांहीं उप–कचेऱ्या वाढविण्यांत येतील.

शहरी भागांत फिरत्या नि रात्र–टपाल कचेऱ्यांची सोय अधिक शहरांत सुरू करण्यांत येईल. तसेंच, टपालाच्या एकंदर कामकाजांत अधिक सुधारणा करण्यांत येईल.

---

## स्कूटर्सच्या किंमती कमी करण्याचे प्रयत्न

स्कूटर्सच्या किंमती कमी करून त्या सामान्य माणसांच्या आवाक्यांत आणण्याची मध्यवर्ती सरकारची इच्छा आहे अशी माहिती उद्योगमंत्री श्री. सिंग यांनीं सांगितली. या बाबतींत बोलतांना ते म्हणाले कीं ४थ्या पंचवार्षिक योजनेअखेर देशांतील स्कूटर्सची वार्षिक मागणी १ लाख, ५० हजारांपर्यंत जाईल. ही मागणी पुरी व्हावी म्हणून उत्पादनाचें उद्दिष्ट वाढविण्यास नियोजन समितीनें संमति दिली आहे. स्कूटर्स तयार करणारे नवे कारखाने काढण्यासाठी १५ उद्योगपतींकडून अर्ज आलेले आहेत. त्यांची छाननी एका कमिटीतर्फे करण्यांत येईल. तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या अखेर दरसाल ७५ हजार स्कूटर्स उत्पादन करण्याचें ठरविण्यांत आलें होतें. सध्यांचें उत्पादन मात्र सालीना ३० हजारांपर्यंतच आहे.

### आग्नेय आशियाच्या विकासासाठी बँक

आग्नेय आशियांतील अप्रगत देशांचा आर्थिक विकास घडवून आणण्यासाठी एक स्वतंत्र बँक स्थापण्याची कल्पना अलीकडे पुढें मांडण्यांत येत आहे. आर्थिक सहकार्य आणि विकास संघटनेच्या मदत समितीमध्यें बोलतांना अमेरिकेच्या अध्यक्षांचे सल्लागार मि. यूजीन ब्लॅक ह्यांनीं ही कल्पना उचलून धरली असून, संकल्पित बँकेच्या स्थापनेच्या कामीं युरोपमधील देशांनींहि हातभार लावावा अशी विनंती केली आहे. ह्या बँकेच्या भांडवलाचें प्राथमिक उद्दिष्ट १०० कोटी डॉलर्सचें असेल आणि पुढील वर्षाच्या पहिल्या सहामाहींत ती कार्यान्वित होईल असा अंदाज आहे. बँकेच्या स्थापनेबाबत अमेरिका आणि जपान ह्या देशांनीं विशेष पुढाकार घेतलेला आहे. एकूण भांडवलाच्या २० टक्के म्हणजे २० कोटी डॉलर्स भांडवल उभारण्याची हमी ह्या दोन देशांनीं घेतलेली आहे. आशियांतील देश, आणि ऑस्ट्रेलिया व न्यूझीलंड ४० टक्के म्हणजे सुमारें ४० कोटी भांडवल घालतील अशी अपेक्षा करण्यांत येत आहे. आशियांतील देश आपल्या भांडवल–उभारणीच्या हिश्श्यापैकीं निम्मा हिस्सा भांडवल स्थानिक चलनाच्या रूपांत देणार आहेत. उरलेल्या २० टक्के भांडवलाची उभारणी युरोपमधील देश आणि रशिया ह्यांच्याकडून होईल अशी अपेक्षा करण्यांत येत आहे. संघटनेवरील जपानचा प्रतिनिधि भांडवल उभारण्याचें काम करण्यासाठी लवकरच युरोपांतील देशांच्या राजधान्यांना भेट देणार आहे. आशियांतील देशांच्या विकासासाठी काढण्यांत येणाऱ्या ह्या बँकेच्या कार्याचें क्षेत्र कोरियापासून इराणपर्यंत पसरलेलें असेल. त्यावरून तिच्या भविष्यकालीन व्यापाची कल्पना करतां येते. आशियांतील अप्रगत देशांचा विकास करण्याच्या कामाची निकड प्रगत देशांतील सरकारांना वाटूं लागली आहे हें सुचिन्हच म्हटलें पाहिजे. कारण, अप्रगत देशांतील आर्थिक कुचंबणेमुळें जहाल राजकीय विचारांना मूळ धरण्यास चांगली संधि मिळते असा इतिहासाचा दाखला आहे.

---

### रशियाच्या नियोजनपद्धतींत बदल होणार !

सोव्हिएट रशियाच्या आर्थिक नियोजनाच्या पद्धतींत बदल होण्याचीं चिन्हें दिसत आहेत. त्या देशांतील वृत्तपत्रांत आर्थिक विषयांबद्दल जे विचार अलीकडे प्रगट करण्यांत येत आहेत, त्यावरून केंद्रित पद्धतीच्या आर्थिक नियोजनांतील दोष रशिअन राज्यकर्त्यांच्या ध्यानांत येऊं लागले आहेत असें दिसतें. नवीन संभाव्य बदलांमुळें औद्योगिक कारखान्यांना अधिकार मिळेल आणि त्यांच्यावर उत्पादनाची जबाबदारीहि जारी करण्यांत येईल. आतांपर्यंत प्रत्येक औद्योगिक संघटनेंतील उत्पादनाबाबतचे सर्व निर्णय मध्यवर्ती नियोजन मंडळाकडून घेतले जात. आतां उत्पादनाबाबतचे आणि कारखाना चालविण्यासंबंधींचे इतर निर्णय वैयक्तिक कारखान्यांच्या चालकांवर सोपविण्यांत येणार असले तरी आर्थिक कार्यक्रमांतील किमतीचें व भांडवल–गुंतवणुकीचें धोरण वरिष्ठ नियोजन मंडळच ठरविणार आहे. १९६४ सालीं रशिआचे माजीपंतप्रधान मि. क्रुश्चॉव्ह ह्यांनीं विकेंद्रित कार्यपद्धतीचें सुतोवाच केलें. कापडाच्या दोन कारखान्यांना लागणारा कच्चा माल मिळविण्याची जबाबदारी त्यांनीं कारखान्यांच्या चालकांवरच टाकली, कारण त्यांना लागणाऱ्या मालाचा पुरवठा करण्याचें काम नेहमींच्या सार्वजनिक संघटनांकडून योग्य रीतीनें पार पाडलें जात नव्हतें. ह्या प्रयोग यशस्वी झाल्याचें आढळून आलें तेव्हां पक्षाचे चिटणीस मि. ब्रेझनेव्ह ह्यांनीं चालू वर्षाच्या प्रारंभीं ४०० कापड गिरण्यांना आणि कांहीं बुटाच्या कारखान्यांनाहि अशीच सवलत देऊं केली. अगदीं अलीकडे ग्राहकांच्या गरजा आणि आवडीनिवडी लक्षांत घेऊन त्याप्रमाणें उत्पादन करण्याचें स्वातंत्र्यहि कांहीं नित्योपयोगी वस्तूंच्या कारखान्यांना देण्यांत आलें आहे. कारखान्यांना वैयक्तिक नफा मिळविण्यासहि प्रवृत्त करण्यांत येत आहे. अर्थात् ह्या घडमोडीचा अर्थ आजच पूर्णपणें समजण्यासारखा नाहीं.

---

### तांब्याच्या शोधासाठी तीन राज्यांत प्रयत्न

आंध्र प्रदेश, बिहार आणि राजस्थान ह्या तीन राज्यांत तांब्याचे साठे हुडकून काढण्याचे प्रयत्न करण्यांत येत आहेत. तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या कालांत भारतामधील उद्योगधंद्यांनीं १ लाख, ३० हजार टन तांब्याचा वापर केला. परंतु तांब्याच्या वापराचें प्रमाण जास्त व म्हणून त्याची मागणी वाढत चाललेली आहे. ४ थ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत भारताला २ लाख ५० हजार टन तांब्याची गरज लागेल. म्हणून भारत सरकारच्या पोलाद व खाणी खात्यानें भूमिगत तांब्याचें खनिज शोधून काढण्याची मोहीम हातीं घेतली आहे. सुमारें ४६ हजार टन तांब्याचें उत्पादन करण्यासाठी तपशीलवार योजनाहि हातीं घेण्यांत आल्या आहेत. कोणत्याहि देशाच्या औद्योगीकरणांत तांबें ह्या धातूला फार महत्त्व आहे. पण, भारत ह्या बाबतींत स्वयंपूर्ण नाहीं. तांब्याची आयात करावयाची तर त्यासाठी अर्थातच परदेशीय चलन लागतें.

---

### लोकसंख्या आणि डॉक्टरांचें गणित

पांचव्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या अखेरीस भारताला १ लाख, ७५ हजार डॉक्टरांची गरज लागेल. ह्यापैकीं १ लाख, २५ हजार डॉक्टर्स तर सरकारच्या वैद्यकीय योजना व सार्वजनिक आरोग्य संघटना ह्यांना आणि स्थानिक स्वराज्य संस्थांना लागतील. सुमारें ५० हजार डॉक्टर्स खाजगी धंदा करण्यास मोकळे राहतील. इतक्या मोठ्या संख्येनें डॉक्टर्स उपलब्ध झाले तरीही भारतामधील डॉक्टर्सचें प्रमाण ३,५०० माणसांमागे एक डॉक्टर असेंच राहील. रशियांत हें प्रमाण ५३५ माणसांना एक, जपानमध्यें ९४३ माणसांना एक, व मेक्सिकोमध्यें १,८०० माणसांना एक असें आहे. १९६५–६६ अखेर भारतामध्यें ८६ हजार डॉक्टर्स असतील आणि त्यांचें लोकसंख्येशीं प्रमाण ५,८०० माणसांमागें १ डॉक्टर असें राहील.

---

### स्वीडनच्या अर्थशास्त्रज्ञाचा इषारा

स्वीडनमधील अर्थशास्त्रज्ञ प्रा. गन्नार मिरडल ह्यांनीं असा इषारा दिला आहे कीं, नजीकच्या भविष्यकालांत जगावर भीषण अन्नटंचाई कोसळणार आहे. ते म्हणाले कीं, सध्यांच अशी स्थिति आहे कीं अमेरिकेनें आपल्याजवळील शिलकी शेतीमाल जर पुरविला नाहीं तर हिंदुस्थान, पाकिस्तान, तुर्कस्थान, इजिप्त आणि आणखी कांहीं देशांतील लक्षावधि लोकांना भुकेनें तडफडावें लागेल व कोट्यवधि लोक अन्नाच्या अभावीं मृत्युमुखीं पडतील. अविकसित देशांमधील शेतीचें उत्पादन वाढविण्यासाठी आणखी कितीतरी भांडवलाची गरज आहे. त्याचप्रमाणें निरक्षरता घालवून लोकांचें राहणीचें मान वाढविण्याचे खरेखुरे प्रयत्न नेटानें करण्यांत आले पाहिजेत. अप्रगत देशांतील शेतीचा व्यवसाय सध्यां चिखलांत रुतल्यासारखा झाला आहे.

## डबाबंद अन्नपदार्थ तयार करण्याचा धंदा

डबाबंद अन्नपदार्थ तयार करणाऱ्या हिंदमधील कारखान्यांपुढें डब्यांना लागणाऱ्या टिनच्या तुटवड्यामुळें अडचणी उत्पन्न होत आहेत. ह्या धंद्यासाठी लागणारें टिन आयात करावें लागतें. देशांतल्या देशांत खपणारे अन्नपदार्थ डब्यांत भरून टिकविण्याच्या कामीं आणि परदेशांत पाठविण्यांत येणाऱ्या डबाबंद अन्नपदार्थांच्या निर्मितीच्या कामीं टिनच्या टंचाईनें अडथळे उत्पन्न झाले आहेत. संस्करण केलेल्या अन्नपदार्थांची निर्यात वाढविण्यासाठी जें मंडळ स्थापण्यात आलें आहे त्याच्या १९६४-६५ च्या अहवालाप्रमाणें अशा पदार्थांची निर्यात अलीकडे वाढत चाललेली आहे. डबाबंद अन्नपदार्थांच्या विक्रीसाठी नव्या बाजारपेठा धुंडण्याचें कामहि चालू आहे. परदेशीय चलनाच्या टंचाईच्या सध्यांच्या स्थितींत अशा अन्नपदार्थांची निर्यात घटूं देणें अधिकच अनिष्ट आहे. पण भारतांत तयार होणाऱ्या डबाबंद अन्नपदार्थांपैकी अवघा १० टक्के माल्च परदेशांत निर्यात करण्यांत येतो. देशांत खपणारे अन्नपदार्थ डबाबंद करण्याचा भारतामधील उत्पादन खर्च फार आहे. एकूण उत्पादन खर्चापैकी ४० टक्के खर्च कच्च्या मालावर करावा लागतो. हंगामांत मिळणारा कच्चा माल जसा मिळेल तसाच तो ह्या धंद्याला वापरावा लागतो; त्याच्या किमतीबद्दल व दर्जाबद्दल चिंता करण्यास सवडच असत नाहीं. त्यामुळें उत्पादन खर्च वाढविणें अपरिहार्य होतें. ऑस्ट्रेलिया आणि डेन्मार्कसारख्या प्रगत देशांत अशी परिस्थिति नाहीं. तेथें ह्या धंद्यासाठी लागणारा कच्चा माल मुद्दाम उत्पादन केला जातो. त्याची प्रत चांगली असते व किंमत बेताची असते. त्यामुळें एकूण उत्पादन खर्चांत बचत होते. टिनच्या टंचाईमुळें भारतामधील डबाबंद अन्नपदार्थ तयार करणाऱ्या कारखान्यांना आपलें लक्ष गांठतां येणार नाहीं व ग्राहकांची अर्थातच गैरसोय होईल. १९६६-६७ पर्यंत पुरेशा टिनची आयात करण्यांत आली नाहीं तर रूरकेला येथें नव्यानें चालू होणाऱ्या कारखान्याची कुचंबणा होईल. २५० कोटी रुपयांची दुधाची भुकटी, मुलांचें अन्न, मासे आणि भाजी डबाबंद करतां येणार नाहीं.

## चीनच्या नौदलाचें वाढतें सामर्थ्य

सागरी युद्धांत पाणबुड्यांचें महत्त्व गेल्या दोन महायुद्धांत स्पष्ट झालेलें आहे. अणुशस्त्रास्त्रांच्या युगांतहि त्यांचें महत्त्व कमी झालेलें नाहीं. कारण, पाणबुड्यांवर क्षेपणास्त्रें ठेवून तीं पाण्यांतूनच लक्ष्यावर सोडतां येतात. पाणबुडी हें आक्रमक स्वरूपाचें शस्त्र आहे म्हणून तें वापरण्यासंबंधीं भारत सरकार उदासीन होतें. पण, चीनचा धोका उत्पन्न झाल्यापासून मात्र पाणबुड्या मिळविण्याचा प्रयत्न जोरानें सुरु आहे. अलीकडे चीननें पाणबुड्या मोठ्या संख्येनें बांधण्यास प्रारंभ केला आहे. चीनच्या सुमारें ३० पाणबुड्या चीनच्या किनाऱ्याच्या आसपास असतात. त्यावरून अग्निबाण सोडण्याची व्यवस्था आहे असें म्हणतात. प्रगत पाश्चिमात्य देशांच्या मानानें चीन ह्या बाबतींत अजून मागासलेला असला तरी भारताशीं तुलना करतां वरचढच ठरेल. चीनच्या नौदलांतील सैनिकांची संख्या १ लाख, ३६ हजार आहे. त्यांत सर्व प्रकारच्या मिळून ८३० बोटी आहेत आणि किनारी तळावरून वापरतां येण्यासारखीं ५०० विमानें आहेत.

## श्री. एस. एम. जोशी ह्यांना दिलेल्या देणगीचा विनियोग

श्री. एस. एम. जोशी ह्यांच्या ६० व्या वाढदिवसानिमित्त त्यांचें अभिनंदन करण्यासाठी नेमलेल्या समितीनें ४,२७,३१८ रु. जमविले. त्यांपैकी १,१८,२५४ रु. एस. एम. जोशी ६० वा वाढदिवस स्मृति ग्रंथांतील जाहिरातींच्या द्वारां मिळाले. झालेला खर्च आणि सौ. ताराबाई जोशी ह्यांना प्रतीकात्मक दिलेली देणगी ह्यांची रक्कम वजा करून उरलेले ३,०६,६०८ रु. श्री. जोशी ह्यांना नजर करण्यांत आले. परंतु ही रक्कम त्यांनीं न स्वीकारतां तिचा विनियोग समाजवादाच्या उद्दिष्टाप्रीत्यर्थ केला जावा असें ठरविलें. त्याप्रमाणें आतां "सोशॅलिस्ट फौंडेशन"ची स्थापना करण्यांत आली आहे; तिच्या कामास ह्या रकमेच्या प्रारंभींच्या शिलकेपासून आरंभ होईल. फौंडेशनच्या ट्रस्टीजमध्यें श्री. एस. एम. जोशी ( चेअरमन ), श्री. ना. ग. गोरे, गोव्याचे मुख्य मंत्री श्री. दयानंद बांदोडकर, स्वस्तिक रबर प्रॉडक्ट्सचे मॅनेजिंग डायरेक्टर श्री. वसंतराव वैद्य, सरदार किराड, श्री. प्रभुभाई संघवी, श्री. बी. एन. राजहंस, श्री. हरिभाऊ गद्रे, इत्यादि गृहस्थ असून श्री. शंकरराव आगाशे हे ट्रस्टचे सेक्रेटरी आहेत.

## वेस्ट इंडीज क्रिकेट संघाचा भारताचा दौरा कसा शक्य होईल ?

भारताच्या परदेशी हुंडणावळीच्या अडचणींमुळें वेस्ट इंडीज क्रिकेट संघाचा भारताचा दौरा रद्द करावा लागला, हें सुप्रसिद्ध आहे. वेस्ट इंडीज क्रिकेट संघाचा उप-कप्तान आणि आघाडीचा फलंदाज, हंट ह्यानें त्यावर एक उपाय सुचविला आहे. त्याच्या उपायाच्या पायऱ्या अशा आहेत :—( १ ) दौऱ्याच्या वाटाघाटी पुन: सुरू कराव्यात, ( २ ) दौऱ्याचा खर्च व नफा ह्याची रक्कम वेस्ट इंडीजच्या व्यापाऱ्यांनीं अंडरराइट करण्याचा वेस्ट इंडीज क्रिकेट बोर्ड ऑफ कंट्रोलनें प्रयत्न करावा, ( ३ ) इंडिया बोर्ड ऑफ कंट्रोलनें दौऱ्याचा खर्च व नफा रुपयांत चुकता करण्याची हमी घ्यावी, ( ४ ) ह्या रुपयांचा उपयोग करून वेस्ट इंडीजच्या व्यापाऱ्यांनीं भारतांतून आवश्यक तो माल आयात करावा व आपले पैसे वसूल करावे.

## फिनॅन्स कमिशनचा अहवाल

चौथ्या फिनॅन्स कमिशनचा अहवाल १५ ऑगस्टच्या सुमारास सादर केला जाईल. हा अहवाल विचारांत घेऊन येत्या पांच वर्षांतील मध्यवर्ती व राज्य सरकारांचीं अंदाजपत्रकें तयार केलीं जातील.

## गुजरातचा किनाऱ्यानें जाणारा हमरस्ता

गुजरात सरकारनें किनाऱ्यानें जाणाऱ्या एका हमरस्त्याची योजना तयार केली आहे. रस्त्यासाठी १५ कोटी रुपये खर्च येणार असून तो राज्यांतील महत्त्वाचीं औद्योगिक केंद्रें आणि बंदरें ह्यांना जोडणारा व राष्ट्रीय रस्त्याला मिळणारा असा असेल. किनाऱ्यानें जाणाऱ्या ह्या रस्त्याचा प्रारंभ बडोद्यापासून होऊन तो भुवरन, खंबायत, वेरावळ, पोरबंदर, ओखा व जामनगर ह्या दिशेनें आंखण्यात येईल. गुजरात राज्याचा किनारा १ हजार मैल लांबीचा आहे. कांडला हे गुजरातचे प्रमुख बंदर आहे. त्याशिवाय १० मध्यम प्रतीचीं आणि ३० लहान बंदरें ह्या किनाऱ्यावर आहेत. गेल्या कांहीं वर्षांत गुजरात राज्यांतील बंदरांच्या वाहतुकींत बरीच वाढ झालेली आहे. त्यामुळें अशा प्रकारच्या किनाऱ्यानजीक असणाऱ्या रस्त्याची विशेष जरूर उत्पन्न झालेली आहे.

**जगांतील सर्वांत लांब बोगदा**—फ्रान्स व इटली ह्या दोन देशांना जोडणारा जगांतील सर्वांत लांब बोगदा मॉंट ब्लॉक शिखराच्या खालून खोदण्यांत आला आहे. बोगद्याचें उद्घाटन नुकतेंच करण्यांत आलें. बोगद्याची लांबी ११.६ किलोमीटर अथवा ७.३ मैल असून त्याचे खोदकामासाठी फ्रेंच व इटालिअन एंजिनिअर्सना ६ वर्षे श्रम करावे लागले. बोगदा तयार करण्यास २.५ कोटी पौंड खर्च आला. त्याचा उपयोग दरसाल १० लाख मोटारी करतील असा अंदाज आहे. तो पार पाडण्यास १५ मिनिटें लागतात. आल्प्स पर्वताच्या रांगांतून जाणारा १०० मैलांचा रस्ता आहे. पण तो खराब हवेंत धोक्याचा असून त्यावरील वासासाठी कधीं कधीं १२ तास सुद्धां लागतात.

**इंडोनेशिआ नुकसानभरपाई मागणार**—इंडोनेशिआने भारताकडून २० लाख डॉलर्स किंमतीचा ताग मागविला होता. इंडोनेशिआच्या शेतकी खात्याच्या पत्रकाप्रमाणें हा माल भारतानें मार्चअखेर पुरवावयाचा होता. मालाची किंमत मागाहून देण्यांत यावयाची होती. भारतानें देऊं केलेला माल पुरविण्याचें स्थगित केल्यामुळें इंडोनेशिआ भारताकडून नुकसानभरपाई मागणार आहे. अजूनपर्यंत हा माल इंडोनेशिआला पोचता करण्यांत आलेला नाहीं.

**पंतप्रधानांचा युगोस्लाव्हिआचा दौरा**—पंतप्रधान शास्त्री ह्यांनीं आपल्या पत्नीसह युगोस्लाव्हिआचा दौरा केला. त्या वेळीं त्यांच्याबरोबर एकोणीस सहप्रवासी गेले होते. हे सर्व लोक कडक शाकाहारी असल्यानें युगोस्लाव्हिआच्या अधिकाऱ्यांना त्यांच्या खाण्यापिण्याची सोय करण्यास बरीच तकलीफ घ्यावी लागली. पाहुण्यांना मनासारखे खाद्यपदार्थ मिळावे म्हणून युगोस्लाव्हिआच्या अधिकाऱ्यांनीं कांहीं मसाल्याचे पदार्थ बरोबर आणण्यास सुचविलें होते.

**कुटुंबनियोजनासाठी अधिक खर्च**—कुटुंबनियोजनाचा प्रसार व प्रचार करण्यासाठी भारत सरकार १९६५ सालीं सुमारें १२ कोटी रुपये खर्च करणार आहे. ह्या खर्चापैकी ४.६ लाख रुपये खर्च परदेशीय चलनांत करावा लागेल. कुटुंबनियोजनाचा कार्यक्रम अधिक परिणामकारक रीतीनें अंमलांत आणण्यासाठी १९६५ च्या मे अखेर ५५ हजार लोकांना प्रशिक्षण देण्यांत आलें आहे. तरीहि ह्या कामासाठी लागणाऱ्या वाकबगार माणसांचा तुटवडा भासत आहे.

**चीनमध्यें अन्नाची तीव्र टंचाई**—चीनच्या भूमींत खाद्यपदार्थांच्या तुटवड्यानें तीव्र स्वरूप धारण केलें आहे. परिणामीं कांहीं भागांतील लोक उंदीर, गवत आणि कापडाचे तुकडेहि भक्षण करून कशीतरी गुजराण करीत आहेत. अन्नधान्याचें वांटप चार आठवड्यांचें म्हणून करण्यांत येतें; पण, हें अन्न सामान्य चिनी कुटुंबाला एक आठवडाभरहि पुरत नाहीं. शिवाय हें वांटप घेणारांना शारीरिक श्रमाचीं कामें करण्याची सक्ती आहे.

**यांत्रिक हत्यारांची निर्यात**—हिंदुस्थान मशीन टूल्स ह्या कारखान्यांत तयार होणारी यांत्रिक हत्यारें अमेरिकेला निर्यात करण्यास कितपत वाव आहे तें पाहण्यासाठी कारखान्याचे मॅनेजिंग डायरेक्टर अमेरिकेस जाणार आहेत. ह्याबाबतची प्राथमिक पाहणी पूर्वीच करण्यांत आली असून ती उत्साहजनक आहे. कारखान्यानें आपलीं ३० लाख रुपयांचीं यंत्रें पोलंडला निर्यात केलेलीं आहेत. कांहीं यंत्रें झेकोस्लोव्हाकिआलाहि निर्यात झालीं आहेत.


## स्वस्तिकचा माल निर्यात होऊं लागला

—: कांहीं बोलके आंकडे :—

| | |
|---|---|
| १९६३ सालांतील मालाची विक्री | रु. १ कोटी, २ लक्ष |
| १९६३ अखेर वसूल भाग-भांडवल | रु. ४३,८१,४८५ |
| कामगारांची संख्या | १,१०० चे वर |
| कारखान्याच्या बांधलेल्या जागेचें क्षेत्रफळ | १,२०,००० चौ. फू. |

— प्रमुख उत्पादनें —

गमबूट्स—होजपाईप्स—प्रेशर होजेस

ग्लोव्ह्ज—इरेझर्स—ऑईल सील्स

व

स्वरूप केबल्स

**स्वस्तिक रबर प्रॉडक्ट्स लि.**

स्वस्तिक गृह, खडकी, पुणें ३.

(टेलिफोन नं. : ५५२०१)

## दि युनायटेड वेस्टर्न बँक लि.

" चिरमुले निकेतन ", १४३/१४६ भवानी पेठ

सातारा-शहर

*दि. १८-२-६५ पासून ठेवींवरील व्याजाचे दरांत खालीलप्रमाणें वाढ झालेली आहे.*

### मुदतीच्या ठेवी

| मुदत | | व्याजाचा दर |
|---|---|---|
| १ वर्ष | द. सा. द. शें. | ६=२५ |
| २ वर्षें | " | ६=५० |
| ३ वर्षें | " | ६=७५ |
| ५ वर्षें | " | ७=२५ |
| ७ वर्षें | " | ७=५० |
| ९ वर्षें व जास्त | " | ७=६२ |

सेव्हिंग्ज बँक खातें:—दि. १-२-६५ पासून ४ टक्के

*तसेंच अल्प मुदतीच्या ठेवी आकर्षक दरानें स्वीकारल्या जातील.*

याबाबत आमच्या कोणत्याहि शाखेंत अधिक माहिती मिळूं शकेल.

**कोचीन येथें खताचा कारखाना**—कोचीन येथें सार्वजनिक मालकीच्या विभागांत एक खताचा कारखाना काढण्याचें भारत सरकारनें ठरविलें आहे. त्याच्या उभारणीसाठी ३१·२५ कोटी रुपये खर्च येईल. कोचीनमधील तेलशुद्धीच्या कारखान्याजवळच तो स्थापन करण्यांत येणार आहे. तेलशुद्धीच्या कारखान्यापासून खताच्या कारखान्याला लागणारा कच्चा माल मिळणार आहे. कारखान्याची उभारणी करण्यासाठी लागणाऱ्या खर्चापैकी ११·०५ कोटी रुपयांचा खर्च परदेशीय चलनांत करावा लागणार आहे. उभारणी पुरी होण्यास दोन ते तीन वर्षे लागतील.

**दिलेल्या कर्जाचा अपुरा उपयोग**—१९६१ च्या ऑगस्टमध्यें जागतिक बँकेनें हिंदमधील कोळशाच्या खाणींचा विकास करण्यासाठी १६·६७ कोटी रुपयांचें कर्ज दिलें होतें. ह्या कर्जाचा उपयोग करून कोळशाच्या नव्या खाणी उघडणें, जुन्या खाणींचा विस्तार करणें आणि जुन्यापुराण्या यंत्रसामग्रीच्या जागीं नवी यंत्रसामग्री बसविणें हीं कामें करण्यांत यावयाचीं होती. परंतु ह्या कर्जापैकी फक्त ८·५७ कोटी रुपयांचाच उपयोग करण्यांत आला. त्यामुळें सरकारला कर्जाची मुदत वाढवून घेणें अगर न वापरलेली रक्कम परत करणें असे दोनच पर्याय राहिलेले आहेत. कर्जाची मुदत ३० सप्टेंबर रोजीं संपत आहे.

**स्कूटर्सच्या उत्पादनाला उत्तेजन**—चौथ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत छोट्या मोटारींच्या उत्पादनाऐवजीं स्कूटर्स आणि व्यापारासाठी लागणाऱ्या मोटारगाड्या तयार करण्यास उत्तेजन देण्याचा विचार भारत सरकार करीत आहे. येत्या कांहीं वर्षांत मालवाहतुकीसाठी लागणाऱ्या १·२५ लाख गाड्या आणि १·५ लाख स्कूटर्स तयार करण्याच्या योजना तयार करण्यांत येत आहेत. तथापि ह्या योजनांबद्दल अद्याप अखेरचा निर्णय घेण्यांत आलेला नाहीं.

**चीनला कोबाल्टचा पुरवठा**—चीननें स्फोट केलेल्या पहिल्या अणु बाँबच्या निर्मितीसाठी दोन स्विस व्यापाऱ्यांनीं चीनला बेकायदेशीर रीत्या कोबाल्टचा पुरवठा केला. हा पुरवठा झेकोस्लोव्हाकिआमार्फत करण्यांत आला. स्वित्झरलंडमधून पळून जातांना त्यांनीं १ कोटी स्विस फ्रँक्सचें कर्जहि करून ठेवलें आहे. पुढें चीनला लागणारें कोबाल्ट अन्य मार्गांनीं मिळूं लागल्यावर हा बेकायदा व्यापार आपोआपच थंड पडला. हे दोघे व्यापारी जर्मनींत लपून बसले असावेत असें म्हणतात.

**क्विनिनच्या निर्यातीचे प्रयत्न**—युरोपांत आणि अमेरिकेंत क्विनिनच्या झाडापासून तयार करण्यांत येणाऱ्या मूलभूत औषधाची मागणी वाढत चाललेली आहे. ती लक्षांत घेऊन क्विनिनची निर्यात करण्याची सूचना मध्यवर्ती सरकारच्या व्यापार मंडळानें केली आहे. भारतांत मद्रास आणि पश्चिम बंगाल ह्या दोन राज्यांतून क्विनिनच्या उत्पादनास लागणारी झाडें आहेत. सध्यां देशांतील क्विनिनला फारशी मागणी नाहीं

**शहरांच्या वाढीचा परिणाम**—संयुक्त राष्ट्र संघटनेच्या आशिया आणि अतिपूर्व विभागाच्या आर्थिक समितीनें आपल्या खास अहवालांत भारतांत होत असलेल्या शहरांच्या वाढीबद्दल धोक्याचा इशारा दिला आहे. भारतामधील शहरांची सध्यां ज्या पद्धतीनें वाढ होत आहे तीमुळें चांगली सुपीक जमीन इमारतींच्या बांधकामासाठी उत्तरोत्तर वाढत्या प्रमाणांत वापरली जात आहे. ही प्रवृत्ति अशीच चालू राहिल्यास येत्या कांहीं वर्षांत अन्नधान्याची परिस्थिति अधिकच बिघडेल. म्हणून दिल्लीसारख्या मोठ्या शहरांतून अनेक मजले असलेल्या इमारती बांधण्यावर भर देण्यांत यावा अशी सूचना समितीनें केली आहे.

**तेल गाळण्याच्या पद्धतींत सुधारणा**—तेल गिरण्यांच्या धंद्याची चौकशी करण्यासाठी भारत सरकारनें एक कमिटी नेमली होती. कमिटीच्या अध्यक्षांनीं अशी सूचना केली आहे कीं, खोबऱ्याचे व इतर तेल गाळण्याच्या धंद्यानें उत्पादनाच्या आधुनिक पद्धतीचा वापर करणें आवश्यक आहे. भारतामधील वनस्पति तेलाची मागणी वाढत चाललेली आहे; आणि त्यांतच खोबऱ्यासारखा गळिताचा पदार्थ सीलोनकडून आयात करणें परदेशीय चलनाच्या टंचाईमुळें अवघड झालें आहे.

**केवळ वाहतुकीचा खर्च ४० लाख रु.**—राजस्थानांत कोटा जिल्ह्यांत उभारण्यांत यावयाच्या अणुशक्तिकेंद्राची यंत्रसामग्री कांडला बंदरांत उतरून घेण्यांत येणार आहे. तेथून ती केंद्राच्या ठिकाणीं रस्त्यानें नेण्यांत येईल. ही वाहतूक करण्यासाठी ४० लाख रुपये खर्च येणार आहे. त्यापैकी ३२ लाख रुपये मध्यवर्ती सरकार देणार असून उरलेला खर्च राजस्थान करणार आहे. केंद्र उभारण्याच्या ठिकाणीं प्राथमिक तयारी चालू आहे. ह्या केंद्रात ४०० मेगॅवॅट वीज उत्पादन येणार आहे.

**पोलाद कंपन्यांना जबर दंड**—न्यूयॉर्कमधील फेडरल कोर्टानें ८ पोलाद कंपन्यांच्या एका गटाला ५० हजार डॉलर्स दंडाची शिक्षा दिली आहे. ह्या कंपन्यांनीं आपसांत समजूत करून कांहीं विशिष्ट प्रकारच्या पोलादाची किंमत वाढविली होती. अशा प्रकारानें किंमती वाढविणें अमेरिकेंत बेकायदा आहे. गटबाजी करण्याविरुद्ध अमेरिकेंत जो कायदा आहे तो मोडण्याबद्दल करण्यांत आलेला हा सर्वांत अधिक दंड आहे. ह्या कंपन्यांनीं आपल्या गुप्त बैठकीचा अधिकृत वृत्तांतहि ठेवलेला नव्हता.

**जपानमधील लोकांचें आयुर्मान**—जपानच्या आरोग्यखात्यानें जमविलेल्या माहितीप्रमाणें जपानमधील पुरुषांच्या आयुष्याची अपेक्षा ६७ वर्षांपर्यंत वाढली असून स्त्रियांच्या आयुष्याची अपेक्षा ७२ पर्यंत वाढली आहे. एका वर्षाच्या आंतील मुलांच्या दरहजारीं मृत्यूचें प्रमाण बरेंच उतरल्यामुळें ही वाढ झाली आहे. जपानी लोकांच्या आहाराच्या संबंधींत झालेल्या बदलांचाहि थोडाबहुत परिणाम झालेला आहे.

दातांच्या स्वच्छतेसाठी

★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यांत या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनीं छापिलें व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणें ४, येथें प्रसिद्ध केलें